## ऋ ण नि र्दे श

आभार प्रदर्शन हा एक औपचारिक भाग असला तरी अंत:करणाची भाषा व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून मी त्याचा स्वीकार करणार आहे.

"भारतातील निवडणुका १९८० ते १९८९ : राजकीय पक्षांचा तुलनात्मक अभ्यास" शोधप्रबंध सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. अनेकांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्यामुळेच मी हे काम पूर्ण करू शकलो.

माझ्या शोधनिबंधाच्या विषयानुरोधाने लेखन, वाचन करण्यासाठी तसेच प्रबंधाचे काम पूर्ण करण्यास ज्यांची सतत प्रेरणा व त्याला योग्य दिशा प्राप्त करण्यासाठी माझे मार्गदर्शक डॉ. सौ. व्ही. पी. रासम (अधिव्याख्या राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) यांचे आत्यंतिक मोलाचे व उत्स्फूर्त मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला अतिशय आनंद वाटेल.

राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. के. के. कावळेकर यांच्या प्रोत्साहनामुळे तसेच डॉ. चौसाळकर, प्रा. सौ. भारती पाटील, श्री संभाजीराव तोरस्कर, प्रा. डी. यु. पवार यांचे बहुमोल मार्गदर्शन या कामात मिळाले. म्हणून मी त्यांचा ऋणी आहे. तसेच माझे मित्र शिवाजी पाटील, सुधाकर चव्हाण यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठाचे बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालय व शिक्षण प्रसारक मंडळाचे कणकवली कॉलेज, कणकवली कॉलेजचे ग्रंथालय यांच्याकडूनही मदत झाली त्यांचा मी आभारी आहे.

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य आर. एम. माने, माजी प्राचार्य सूर्याजीराव परब यांच्या मोलाच्या व उत्स्फूर्त सहकार्यामुळे मी हा शोधप्रबंध लिहू शकलो म्हणून त्यांचाही शतशः आभारी आहे. तसेच माझ्या महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक श्री बाळासाहेब घोरपडे, सुहास देशपांडे, सुधीर भोसले, एस.एन. पाटील, बबन खामकर यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले त्यांचाही मी आभारी आहे.

एम्.फिल. पदवी करण्याची इच्छा प्रबळ करण्याच्या कार्यात माझे वडिल श्री पांडुरंग परशुराम वेल्हाळ, माझी मातोश्री सौ. आनंदी पांडुरंग वेल्हाळ व भाऊ श्री रामचंद्र बा. वेल्हाळ यांच्या अतिव सहकार्यामुळेच हा प्रबंध लिहिण्यास मी यशस्वी होऊ शकलो.

प्रबंधाच्या टंकलेखनाचे काम श्री विजय पाटील यांनी केले त्यांचाही मी आभारी आहे.

या शोधप्रबंधाच्या तयारीच्या कामी ज्या अनेकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य, प्रोत्साहन लाभले त्यांचाही ऋणनिर्देश करणे मी माझे नैतिक कर्तव्य समजतो.

धन्यवाद.

कोल्हापूर. (शंकर पा. वेल्हाळ)

दि.